**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या दशकपूर्ती निमित्त प्रधानमंत्र्यांचा निवडक लाभार्थ्यांशी संवाद

- नवीन वाळू धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- भारतीय रिझर्व्ह बँकेला ग्लोबल फायनान्सचा नवोन्मेषी आर्थिक संस्था पुरस्कार जाहीर

**आणि**

- वर्धा इथं वाहन अपघातात एकाच कुटुंबातले चौघे जण ठार

<><><><><><>

होतकरु तरुणांमधे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रसरकारनं सुरु केलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला आज दहा वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या निवासस्थानी योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विविध लाभार्थ्यांनी उद्योजकतेचे अनुभव सांगितले. देशातल्या तरुणांना सक्षम, स्वावलंबी करणं आणि त्यांना आत्मविश्वास मिळवून देणं तसंच केवळ नोकरी शोधणाऱ्यांऐवजी रोजगार निर्माण करण्याची क्षमता निर्माण करणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. लाभार्थ्यांपैकी निम्मे अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी प्रवर्गातले असून ७० टक्क्यांहून अधिक लाभार्थी महिला आहेत. मुद्रा योजनेअंतर्गत तामिळनाडूमध्ये सर्वाधिक कर्जवाटप झालं असून त्याखालोखाल उत्तर प्रदेश आणि कर्नाटकचा क्रमांक लागतो तर केंद्रशासित

प्रदेशांमध्ये जम्मू-काश्मीर आघाडीवर आहे. मुद्रा योजनेला आंतरराष्ट्रीय स्तरावरही मान्यता मिळाली असून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं भारताच्या सर्वसमावेशक उद्योजकतेला चालना देण्याच्या भूमिकेचं कौतुक केलं आहे. गेल्या दहा वर्षांत या योजनेअंतर्गत ५२ कोटींहून अधिक रकमेचं कर्ज मंजूर करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सूक्ष्म आणि लघु उद्योगांना २० लाख रुपयांपर्यंत विनातारण कर्ज दिलं जातं.

<><><><><><>

राज्य मंत्रीमंडळानं आज नवीन वाळू धोरणाला मंजुरी दिली. याअंतर्गत घरांच्या बांधकामांसाठी ५ ब्रास वाळू मोफत दिली जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नव्या धोरणात डेपो पद्धत बंद करुन उपविभागात २ वर्षांसाठी लिलाव केले जाणार आहेत. खाडी पात्रात ही लिलावाची मुदत ३ वर्षांसाठी असेल. धरणांमधून वाळू उत्खनन करुन त्यांची क्षमता वाढवण्यावरही आजच्या बैठकीत चर्चा झाल्याचं ते म्हणाले. मंत्रीमंडळाच्या पुढच्या बैठकीत कृत्रिम वाळू धोरण आणलं जाणार असून दगडापासून ही वाळू बनवण्याचं नियोजन आहे. यापुढे सर्व सरकारी बांधकामांसाठी हीच वाळू वापरण्याचा विचार असल्याचं ते म्हणाले.

राज्यातल्या सिंधी स्थलांतरितांच्या ३० वसाहतींना राज्य सरकारनं मंजुरी दिली. इथल्या नागरिकांकडून घर खरेदी केलं तेव्हाचा रेडी रेकनर दर आणि ५ टक्के शुल्क तर व्यावसायिक मालमत्तांसाठी १० टक्के दरानं शुल्क आणि रेडी रेकनर आकारणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

<><><><><><>

अमेरिकेने आकारलेल्या कराचे तीव्र परिणाम काल भारतासह आशियाई शेअर बाजारांवर जाणवले. मात्र आज भारतीय शेअर बाजार कालच्या तुलनेने सावरला आहे. सेन्सेक्स आज दुपारपर्यंत २ पूर्णांक ३ शतांश टक्क्यांनी वधारला असून निफ्टी २ पूर्णांक १४ शतांश टक्क्यांनी वधारला आहे.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेची निवड ग्लोबल फायनान्स या अर्थविषयक मासिकाने जागतिक पातळीवर सर्वात नवोन्मेषी आर्थिक संस्था म्हणून केली आहे. आर्थिक क्षेत्रात सातत्यानं नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. कर्जाची प्रक्रिया सुलभ करणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या ‘युनिफाईड लेंडिंग इंटरफेस’मुळे हा पुरस्कार मिळाल्याची, तसंच हा पुरस्कार मिळवणारी आरबीआय ही पहिलीच मध्यवर्ती बँक असल्याची माहिती रिझर्व्ह बँकेनं समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये दिली आहे.

<><><><><>

कॉमेडियन कुणाल कामरा याच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयानं आज राज्य सरकार आणि आमदार मूरजी पटेल यांना उत्तर द्यायला सांगितलं. तसंच कुणाल कामराला १६ एप्रिलपर्यंत अटकेपासून संरक्षण दिलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याप्रकरणी आपल्यावर दाखल झालेला गुन्हा रद्द करायची मागणी कामरा यानं याचिकेद्वारे केली होती.

<><><><><>

महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या पोषण पंधरवड्याच्या सातव्या आवृत्तीची सुरुवात आजपासून होत आहे. या वर्षीचा पोषण पंधरवडा चार विषयांवर आधारित

आहे. नवजात अर्भकांच्या पहिल्या १ हजार दिवसांमधलं संगोपन, पोषण ट्रॅकर योजनेच्या लाभार्थ्यांविषयी माहिती देणं, कुपोषणावरच्या उपायांचं प्रभावी व्यवस्थापन आणि लहान वयातला लठ्ठपणा दूर करण्यासाठी निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणं, या चार विषयांवर यंदाचा पोषण पंधरवडा साजरा होणार आहे. या उपक्रमाची सुरुवात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली असून या उपक्रमाचं उद्दिष्ट गर्भवती महिला, स्तन्यदा माता, किशोरवयीन मुली आणि सहा वर्षांखालच्या मुलांच्या योग्य पोषणावर भर असा आहे.

**<><><><><>**

परभणी इथले आंबेडकरी कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीतल्या मृत्यू प्रकरणी न्यायालयीन चौकशी करावी अशी मागणी याचिकाकर्ते ॲडव्होकेट प्रकाश आंबेडकर यांनी आज औरंगाबाद उच्च न्यायालयात केली. याप्रकरणी एसआयटी नेमावी, ती न्यायालयाच्या देखरेखीखाली असावी, अशी मागणीही आंबेडकर यांनी केली आहे. सीआयडीलाही या प्रकरणात समाविष्ट करण्याचा विचार असल्याचं त्यांनी सांगितलं. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजी होणार आहे.

**<><><><><>**

२००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणाच्या प्रत्यापर्णाचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रत्यार्पणाला स्थगिती देण्याची मागणी करणारा त्याचा अर्ज अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला आहे. तहव्वूर राणा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक असून सध्या तो लॉस एंजेलिस मधे डिटेन्शन सेंटरमध्ये आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ मध्ये झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार त्याला भारताच्या ताब्यात दिलं जाणार आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांची लढत होणार आहे. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर दुपारी साडेतीन वाजता सामन्याला सुरुवात होईल. तत्पूर्वी नाणेफेक जिंकून कोलकाता नाईट रायडर्सनं प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

स्पर्धेतला आजचा दुसरा सामना संध्याकाळी साडेसात वाजता चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात होणार आहे. सलग तीनही सामने गमावलेल्या चेन्नईसाठी हा सामना महत्वाचा आहे.

<><><><><>

वर्धा जिल्ह्यात तरोडा इथं झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातल्या ४ जणांचा मृत्यू झाला. मरण पावलेले पोलीस कर्मचारी आणि त्यांचं कुटुंब मांडगाव इथून रामनवमी कार्यक्रमाहून परतत होते. वाटेत आलेल्या जनावराला वाचवण्यासाठी गाडी वळवताना नियंत्रण सुटल्यानं ती दुभाजकाला धडकून हा अपघात झाला.

<><><><><>

मुंबई विमानतळावर सीमा शुल्क अधिकाऱ्यांनी दोन प्रवाशांकडून ९ कोटी ५३ लाख रुपयांचा गांजा आणि ५८ लाख ८३ हजार रुपये किमतीचं सोनं जप्त केलं. याप्रकरणी एका प्रवाशाला अटक करण्यात आली आहे. एक प्रवासी बँकॉकहून इंडिगो एअरलाइन्सच्या विमानानं मुंबईला तर दुसरा इंडिगो एअरलाइन्सच्या विमानानं दुबईहून मुंबईला आला होता.

<><><><><>

वसईमध्ये वालीव इथे ११ कोटी ५८ लाख रुपयांच्या अंमली पदार्थांसह एका नायजेरियन नागरिकाला अटक करण्यात आली आहे. या अंमली पदार्थांविषयीची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीवरून वालीव इथल्या एका रहिवासी इमारतीवर पोलिसांनी छापे टाकले. या छाप्यातून ११ कोटी ५८ लाख रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या अंमली पदार्थांची पालघर इथे विक्री होणार होती अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><><><>

नाशिक-पुणे महामार्गावर आंबेडकरवाडी इथं झालेल्या दोन भावांच्या हत्येच्या निषेधार्थ आंबेडकरवाडीतल्या नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला. या गुन्ह्यातल्या आरोपींना पोलीस वाचवत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आंदोलकांनी खुनाचा तीव्र निषेध नोंदवून संबंधित पोलिसांना बडतर्फ करण्याची मागणी केली. या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले होते. दरम्यान पोलिस आयुक्तांनी संबंधित गुन्ह्याच्या तपासाकरिता विशेष तपास समिती स्थापन केले असून त्याद्वारे सखोल तपास करण्यात येत असल्याचं सांगितलं.

<><><><><><>

भारतीय हवामान विभागाने आज महाराष्ट्रात अनेक भागात कमाल तापमानात २ ते ३ अंशांची वाढ होण्याचा अंदाज वर्तवला आहे. तसंच विदर्भात येत्या दोन ते तीन दिवसात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे.

//<><><><><><>//